
हत्तींची आवड

एका फिल्ड शास्त्रज्ञाचे रोमांचक जीवन

मराठी : अश्विनी बर्वे



एका घोड्याच्या उंच पाठीची कल्पना करा,जिच्या पलीकडचे आपण बघू शकत नाही.

आता तुम्ही एका छोट्या मुलीची कल्पना करा,जी फक्त सात वर्षाची आहे. ती त्या उंच घोड्यावर स्वार झाली होती, आणि जमिनीच्या खूप उंचावर होती.ती छोटी मुलगी होती-- **सिंथिया जेन मॉस**.

ती घाबरत नसे.

सिंथिया मॉसला मोठ्या गोष्टींची भीती वाटत नसे.



जेव्हा सिंथिया बारा वर्षाची होती, तोपर्यंत ती आपल्या स्वतःच्या घोड्यावर केलीवर बसून, न्यूयॉर्क मध्ये आपल्या घराच्या जवळ दौड मारत असे.

सिंथिया आणि केली हरिणे आणि कोल्हांना बघत असे.अशा प्रकारे तिला जंगलाविषयी प्रेम वाटू लागले आणि निसर्गातील सर्व जीवांविषयी तिला प्रेम वाटू लागले.




सोळा वर्षाची असतांना सिंथिया घरापासून दूर आपल्या पहिल्या साहस यात्रेवर निघाली.

दूर व्हर्जिनिया मध्ये एका शाळेत होणाऱ्या स्पर्धेत भाग घेण्यासाठी तिने चारशे मैलापेक्षा अधिक दक्षिणेकडे प्रवास केला. त्यात भाग घेणाऱ्या सगळ्या लोकांचे तिच्यासारखेच घोडेस्वारीवर प्रेम होते.



नंतर जेव्हा सिंथियाचे कॉलेजशिक्षण संपले तेव्हा तिला हे माहित नव्हते की, लवकरच ती एक मोठे साहस कार्य सुरु करणार आहे. ती एक वैज्ञानिक होईल!



जेव्हा सिंथिया एक वर्तमानपत्रात रिपोर्टरचे काम करत होती, तेव्हा तिच्या मैत्रिणीने तिला आफ्रिकेतून खूप पत्रं लिहिली. अफ्रीका, पृथ्वी वरील सगळ्या मोठा द्सुरे महाद्विप आहे.

पेनीचे पत्रं वाचून सिंथियाच्या मनात आफ्रिका बघण्याची इच्छा जागृत झाली.


खूप लोक एकटे आफ्रिकेत जायला घाबरत असत.

पण सिंथिया मॉस त्या मोठ्या महाद्वीपाला बिलकुल घाबरली नाही.

तिथं पोहचल्यावर सिंथिया आफ्रिकेच्या प्रेमात पडली.

“आफ्रिकेत पोहचल्यावर एकाच आठवड्यात ती म्हणाली, “मला समजलं की मी माझ्या घरी आले आहे.”

सिंथिया, पूर्व आफ्रिकेच्या विस्तीर्ण मैदानामध्ये आपलं बाकी जीवन घालवू इच्छित होती.



पण आधी तिला एक नोकरी हवी होती. सुदैवाने सिंथियाची भेंट आफ्रिकी हत्तींचा अभ्यास करणाऱ्या एका प्राणी वैज्ञानिकाशी झाली. त्यांनी तिला आफ्रिकी हत्तींचे फोटो काढायला सांगितले. आफ्रिकी हत्ती पृथ्वीवर सापडणारे सगळ्यात विशाल जीव आहेत.


कल्पना करा आपल्याजवळ एक कॅमेरा आहे आणि तुम्ही एका विशाल पार्क मध्ये आहात जिथं सगळीकडे हत्ती आहेत. प्रत्येक कोपऱ्यातून त्यांचे छोटे भुरे डोळे, त्यांची सुरकतलेली कातडी, त्यांची लांब, मजबूत सोंड आणि त्यांचे नरम जाडी पाउलं दिसत आहेत.

पण सिंथियाने हत्तींच्या कानाच्या बाहेरच्या बाजूच्या कडेला असणाऱ्या नसा, छिद्र आणि नागमोडी वळणाचा अभ्यास केला.

तिने हत्तींचे लांब सुळे बघितले-सरळ, टोकदार, आणि काहींचे तर गायब झाले होते, त्यांचा अभ्यास केला.

सिंथिया हत्तींना वेगवेगळे करायला आणि त्यांना ओळखायला शिकली.





लवकरच सिंथियाला त्या विशाल, कोमल प्राण्याविषयी प्रेम वाटू लागलं. तिला हत्तींच्या जंगली आणि धूळभरल्या घरांबद्दल प्रेम वाटू लागले.

"ते इतके प्रभावशाली, उल्लेखनीय आणि जटिल प्राणी आहेत," ती म्हणाली. "मी त्यांचा अभ्यास करण्यासाठी आपलं सर्व जीवन समर्पित करेन."


म्हणून सिंथियाने एम्बोसली एलिफेंट रिसर्च प्रोजेक्ट सुरु केला.


सिंथियाला तेव्हा माहित नव्हतं की हे कामच तिच्या आयुष्याचे ध्येय होईल.

तिला एवढंच माहित होतं की ती हत्तींच्या बाबतीत अधिक जाणून घ्यायचं आहे.

तिला जाणून घ्यायचं होतं की हत्ती परिवाराबरोबर कसे राहतात. जेव्हा खूप पाऊस पडत असे आणि गवत रसदार असे तेव्हा त्यांच्या परिवाराचे मोठमोठे समूह होत असत.

जेव्हा पाऊस कमी पडे आणि दुष्काळ पडत असे तेव्हा हे समूह एक दुसऱ्याला जिवंत राहण्यासाठी कशी मदत करत?





आधी सारखं सिंथियाने त्यांचे फोटो घ्यायला सुरुवात केली.


सिंथिया म्हणाली, “मी ते फोटो घरी आणत असे आणि त्यांच्याकडे भिंगातून लक्षपूर्वक बघत असे. आणि सगळ्या हत्तींना त्यांच्या कानांच्या आधारे ओळखण्याचा प्रयत्न करत असे.”

शेवटी तिला ओळखू यायला लागले की समुहात कोण आईवडील आहेत,कोण बहीण भाऊ आहेत,कोण काकू –आजी आहेत.इत्यादी.

ते एक मोठं काम होतं,पण सिंथिया मॉस ला मोठ्या कामांची भीती वाटत नसे.

या दरम्यान, सिंथियाने असेम्बली नॅशनल पार्क मध्ये एक कायमस्वरूपी तंबू ठोकला.


तंबू मधून आफ्रिकेचे उंच पर्वत, माउंट किलिमंजारो वर बर्फाची पसरलेली चादर दिसत असे.



सिंथिया आपल्या लैंड रोवर गाडीमधून रोज पार्क मध्ये फिरत असे आणि हत्तींच्या पिल्लांना त्यांच्या सोंडेने मातीत खेळतांना आणि ओरडतांना पाहत असे.

तेव्हा आई हत्तीण आपल्या मुलांचे राखण करत असे-भुकेल्या वाघांपासून आणि तरसापासून

आणि जेव्हा मागे पडलेले हत्ती एक दुसऱ्यांना भेटत तेव्हा ते एकमेकांच्या शरीरावर शरीर घासत, आपल्या सोंडी एकमेकांच्या सोंडीत अडकवत,कान फडफडवत, आणि आपले दात एकमेकांच्या दातावर रगडवत आणि मग ओरडत ओरडत एक-दुसऱ्यांना अभिवादन करत.



सिंथियाने आजी हत्तीणींना बघितलं,ज्यांना पाऊस पडला नाही तरी खायला अन्न आणि पाणी कुठे मिळेल याची ठिकाणं माहित होते.

सिंथिया आपली विशेष आवडती हत्तीण 'इको' कडे बघे आणि तिच्याकडून ती शिके. इंको चे मस्त भारदार दात होते. कल्पना करा जेव्हा ती सुंदर मातृवंशाची हत्तीण हळूहळू सिंथियाच्या गाडीकडे आली आणि तिने आपल्या सोंडेने स्पर्श केला.जसे की असे टकटक करून ती तिला नमस्ते करत आहे असे वाटे.

सिंथियाने हळूहळू हत्ती परिवाराबद्दल अशा कितीतरी गोष्टी जाणून घेतल्या, ज्या इतर कोणाला माहित नव्हत्या.

सिंथिया म्हणते, "हत्ती ज्या गोष्टी करतात ज्यांची अपेक्षा आपण आपल्या सगळ्यात चांगल्या मित्रांकडून करतो."

"ते एक-दुसऱ्याचे रक्षण करतात, ते एक-दुसऱ्याची काळजी घेतात, आणि एक-दुसऱ्याला मदत करतात."



पण सगळे लोक हत्तींवर सिंथिया इतके प्रेम करत नाही.

फक्त दहा वर्षात आफ्रिकेतले अर्धे हत्ती मारले गेले होते.

त्या काळात दर दहाव्या मिनिटाला, जगात कमीत कमी एका हत्तीचा मृत्यू होत असे.

कल्पना करा एक विशाल नर हत्ती, जो आफ्रिकेच्या सावाना मैदानात फिरतो आहे, घास आणि छोटी झाडे आपल्या सुळ्यांनी उखडत आहे आणि निळ्या विशाला आकाशाखाली ते खात आहे.

आता कल्पना करा की दुसऱ्या दिवशी तो हत्ती सूर्यप्रकाशाखाली मरून पडला आहे, त्याचे सुंदर दात गायब झाले आहेत, ज्याचा उपयोग पियानोच्या कीज, नक्षीदार दागिने करण्यासाठी केला जातो.

जेव्हा सगळ्यात जुन्या हत्ती आणि हत्तीणीचे मूल्यवान दात गायब झाले तेव्हा सिंथियाला त्या हत्तींच्या परिवारांची काळजी वाटू लागली..

आता वडील हत्ती कोण होईल?

हत्तींच्या पिल्लांचे रक्षण कोण करेल?

अन्न आणि पाणी शोधण्यासाठी गुप्त जागा परिवाराला कोण दाखवेल?



सिंथियाने हस्तदंताबद्दल सगळ्या जगाला सांगायला सुरुवात केली.

ती म्हणाली हत्तीचे दात अतिशय सुंदर गोष्ट आहे जे स्वच्छ केले की छान चमकतात.

पण लोक हे विसरून जातात की हस्तीदंत हा कधीतरी जिवंत हत्तीचा दात होता.


लालची शिकारी हत्तीला त्याच्या दातासाठी मारतात.

मग सिंथिया हत्तींचे दात काढणे अवैध आहे असा करार करण्याच्या विश्वच्या लढाईत सामील झाली.

हा एक मोठी परिक्षाच होती, पण सिंथिया मॉस मोठ्या परीक्षांना घाबरत नसे.



जानेवारी १९९०मध्ये हत्तींचे दात विकण्यावर जगभर प्रतिबंध लावण्यात आला. पण सगळे देश या बंदीवर सहमत नव्हते.म्हणून हत्तींच्या दातांची लढाई समाप्त झाली नाही. खूप लोकांना अजूनही हत्तींचे दात हवे असतात, की ते त्यासाठी एका शांत आफ्रिकी हत्तीला मारून टाकतात. सिंथियाने याच्या विरुद्ध नेहमीच आपला आवाज उठवला.



सिंथिया मॉसने एम्बोसेली एलिफेंट रिसर्च प्रोजेक्ट सुरु करून चाळीस पेक्षा अधिक वर्ष झाली.

सिंथिया, जी घोड्यावर स्वार होणारी एक छोटी मुलगी होती, जिने स्वप्नातही विचार केला नव्हता की एक दिवस ती एम्बोसेली हत्तीच्या जीवनाचा एक महत्त्वपूर्ण भाग होईल.

सिंथियाने दोन हजार पाचशे पेक्षा अधिक हत्तींचा अभ्यास केला आहे.

तिने हत्तींचा जन्म आणि त्यांचा मृत्यू बघितला आहे. एवढंच नाही तर २००९ मध्ये तिने आपल्या प्रिय ‘इको” चा मृत्यू सुद्धा पाहिला.

आता सिंथिया नेहमी व्याख्यान देण्यासाठी आणि पैसे गोळा करण्यासाठी प्रवास करते.प ण सिंथियाने कधीही हत्तींचा अभ्यास करणे सोडले नाही. ती जगभर भाषणातून,फिल्म मधून, लहान आणि मोठ्या माणसांच्या पुस्तकामधून हत्तींची स्थिती बद्दल लोकांना जागृत करत आहे.आजपर्यंत जंगली हत्तींचे सगळ्यात मोठ्या काळाचे अध्ययन करण्यासाठी सिंथियाने आपले जीवन समर्पित केले आहे. तिने इको, इकोची पिल्लं यांच्याबद्दल सगळे काही शिकण्याचा प्रयत्न केला.ज्यामुळे एम्बोसली मध्ये येणाऱ्या सगळ्या हत्तींना समजण्यास तिला मदत झाली.

हे खूप मोठे काम आहे. पण
सिंथिया मॉस मोठ्या कामाला घाबरत नाही.



सिंथिया मॉस चा जन्म १९४० मध्ये झाला आणि त्यांनी मागची चाळीस वर्षे केनिया च्या एम्बोसेली नेशनल पार्क मध्ये हत्ती बरोबर त्यांचा अभ्यास करत व्यतीत केले.

व्हर्जिनिया मध्ये दक्षिणी सेमिनरीची विद्यार्थी झाल्यानंतर,त्यांनी स्मिथ कॉलेज मध्ये दर्शनशास्त्रचा अभ्यास केला. १९६२मध्ये कॉलेजची डिग्री घेतल्यानंतर सिंथियाने दोन वर्षे रिपोर्टर आणि शोधपत्रकार म्हणून न्यूजवीक वर्तमान पत्रात काम केलं. तेव्हा तिची मैत्रीण पेनी नेलोर तिला आफ्रिका आणि तिथले हत्ती यांविषयी मोठे लांबलचक वर्णन करणारे पत्र लिहित असे.१९६७ मध्ये सिंथियाने स्वतः आफ्रिकेत जाण्याचा विचार केला. मग तिला आफ्रिका आणि तिथले हत्तीविषयी प्रेम वाटले. सिंथियाच्या आई-वडिलांचे निधन झाले होते, तिची लहान बहीण कैरोलिन शिवाय त्यांच्या कुटुंबात कोणी नव्हते. म्हणून ती अमेरिका सोडून आफ्रिकेत आली.

जेव्हा सिंथिया पाहिल्यादां आफ्रिकेत गेली तेव्हा सुदैवाने तिची भेट स्कॉटिश पत्रकार इयन डगलस-हैमिल्टन यांच्याशी झाली. ते उत्तर टाझनियाच्या लेक मैनारा नेशनल पार्क मध्ये हत्तीचे सामाजिक सहभाग यावर अभ्यास करत होते. व्यक्तिगत हत्तींना ओळखण्यासाठी त्यांना पार्क मधील चारशे हत्तींचे फोटो हवे होते. त्यांनी ते काम सिंथियाला सोपवले. काम पूर्ण झाल्यावर सिंथियाने शोधकार्य सुरु करण्याचे ठरवले. शेवटी १९७२ मध्ये तिने आपला सहकारी हार्वे क्रोस बरोबर पूर्ण केलं, तिने एम्बोसली राष्ट्रीय उद्यानात संशोधन करण्याची योजना आखली., जे दक्षिण केनियाच्या संरक्षित भूमीत १५० मैलात पसरले होते. जेव्हा १९७४ मध्ये क्रॉस निघून गेले तेव्हा सिंथिया तिथेच थांबली आणि हत्तीबरोबर राहू लागली.

हत्तींच्या बाबतीत जाणून घेण्याची सिंथियाची इच्छा कधीच कमी झाली नाही. ती त्यांच्या प्रति धैर्यवान आणि प्रामाणिक होती.ती हत्तींच्या बाबतीत खूप काही जाणत होती.ती हत्तींच्या मधले कौटुंबिक नात्याच्या बाबत असलेल्या प्रश्नाची नवीन उत्तरे शोधत होती.ती आपल्या हत्तींच्याबाबत खूप प्रेमाने बोलत असे,मग ती एम्बोसली मधल्या साईटवरील मुलाखत असो की मोठ्या दानशूर व्यक्ती बरोबर बोलत असो.मागील चार दशकांपासून तिचे जीवन हत्तींच्या जीवनाशी जोडले गेलेले आहे.

इतर संशोधकसुद्धा आफ्रिकी हत्तींचा अभ्यास करत होते.जगातील सगळ्यात महान हत्ती वैज्ञानिकापैकी एक व्यक्ती जिने प्रथम सिंथियाची ओळख हत्तीशी करून दिली- डॉ. इयन डगलस-हैमिल्टन. त्यांची मुख्य रुची ही हत्तींच्या भटकंतीचा शोध घेण्यात आहे.१९८९ मध्ये तिने विश्व हत्ती दात व्यापार प्रतिबंध आणण्यासाठी मदत केली आणि संशोधन,संरक्षण,शिक्षण आणि प्रवास या माध्यमातून हत्तींचे भविष्य निश्चित करण्यासाठी १९९३ मध्ये सेव्ह द एलिफंटस(www.savetheelephants.org)ची स्थापना केली.

आफ्रिकेतले हत्ती आता खूप धोक्यात आहे.जितके अधिक संशोधक त्यांच्याबाबत शिकत आहेत आणि ते ज्ञान लोकांना सांगत आहेत,तितके जगातले लोक सिंथिया मॉसच्या प्रिय हत्तींना समजून घेतील आणि त्यांच्यावर प्रेम करतील

